# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/A10843 दिनांक : 08/01/2019

## परिपत्रक

**विषय : मुदतवाढ मंजूर करताना मुदतवाढ शुल्क आकारण्याची कार्यपध्दती..**

संदर्भ :- १) परिपत्रक क्र. मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/A७१२२२ दि. ०६.०३.२०१३

२) परिपत्रक क्र. मऔविम/भूविभाग/D९०५२६ दिनांक ०३.११.२०१७

भूखंडधारकांनी महामंडळामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मुदतवाढ धोरणानुसार भूखंडावर बांधकाम पूर्ण केलेले आहे किंवा काही टक्के बांधकाम पूर्ण करून त्यांना उत्पादनात जाऊन किंवा कागदपत्रे सादर करून इमारत पूर्णत्वाचा दाखला संबंधित उप अभियंता यांचेकडून घेणे आहे. अशा भूखंडधारकांना सदरहू कार्यवाही पूर्ण करण्याकरीता काही महिन्यांचीच मुदतवाढ आवश्यक असते, परंतु, महामंडळाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या धोरणानुसार संपूर्ण वर्षाकरीता मुदतवाढ मंजूर करण्याचे धोरण आहे. त्यामुळे भूखंडधारकांना काही महिन्याच्या मुदतवाढीकरीता नाहक संपूर्ण वर्षाकरीता ना परतीची अतिरिक्त अधिमूल्याची रक्कम भरावी लागत आहे. याबाबत महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ०२.०४.२०१८ रोजी झालेल्या ३७४ व्या बैठकीत विषय चर्चीत होवून ठराव क्र. ५७४१ पारीत करण्यात आला. सदरहू ठरावानुसार मुदतवाढ मंजूर करताना मुदतवाढ शुल्क आकारण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती निर्गमित करण्यात येत आहे.

१) ज्या भूखंडधारकांने त्याचे भूखंडावरील इमारतीचे बांधकाम विकास कालावधीमध्ये/वाढीव कालावधीमध्ये पूर्ण केलेले नाही त्यांनी महामंडळामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मुदतवाढ धोरणानुसार भूखंडावर बांधकाम पूर्ण केलेले आहे किंवा शिल्लक बांधकाम पूर्ण करून त्यांना उत्पादनात जाऊन किंवा काही कागदपत्रांची पूर्तता करून इमारत पूर्णत्वाचा दाखला संबंधित उप अभियंता, विशेष नियोजन प्राधिकरण यांचेकडून घेणे आहे, अशा परिस्थितीत त्याने महामंडळाकडे अर्ज केल्यास, त्यांची मुदतवाढ शुल्काची परिगणना त्रैमासिक पध्दतीने करण्यात यावी.

**उदाहरणार्थ:-** एखाद्या उद्योजकाचा विकास कालावधी दि. १ जानेवारी रोजी संपला असेल व त्याने १ फेब्रुवारी रोजी इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करण्यासाठी अर्ज केला असेल अशा वेळेस मुदतवाढ मंजुर करताना मुदतवाढ शुल्क पूर्ण वर्षाकरीता न आकारता प्रभाग निहाय मुदतवाढ शुल्क त्रैमासिक (९० दिवस) १ जानेवारी ते ३१ मार्च पर्यन्त परिगणित करण्यात यावे. जर उद्योजकाने १ एप्रिल रोजी अर्ज केला

असेल तर मुदतवाढीचे शुल्क आकारताना १ जानेवारी ते ३० जून पर्यन्त (६ महिने) परिगणित करण्यात यावा. याप्रमाणे पुढील मुदतवाढीकरीता शुल्क परिगणीत करण्यात यावे.

२) सदरहू त्रैमासिक परिगणना करण्याचे धोरण पहिल्या व दुस-या मुदतवाढीकरीता लागू राहील. अशा प्रकरणी महामंडळाच्या संदर्भांकित परिपत्रक क्र. १ मध्ये नमूद इतर अटी व शर्ती लागू राहतील

३) संदर्भांकित परिपत्रक क्र २ मध्ये नमूद प्रमाणे तिसरी व चौथी मुदतवाढ ५ टक्के शुल्क आकारुन संपूर्ण वर्षाकरीता मुदतवाढ मंजूर करण्यात यावी.

४) सदरहू मुदतवाढीचा लाभ महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील औद्योगिक, व्यापारी, निवासी तसेच उद्योग विस्तार, प्राधान्य सदराखाली वाटप करण्यात आलेल्या भूखंडांना लागू राहील.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अण्णासाहेब मिसाळ)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई